महाज्योती
— ज्ञानदीप समतेचा —

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/1878/2024-25 दिनांक :- 01/08/2024

**भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील युवक - युवतींना लष्करातील सैनिक भरती परीक्षा पुर्व प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षण केंद्रात रुजु होण्याकरीता परिपत्रक**

महाज्योतीमार्फत भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील युवक - युवतींना लष्करातील सैनिक भरती परीक्षा पुर्व ऑफलाईन प्रशिक्षण 2024-25 करीता विद्यार्थ्यांची निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच दि.05/08/2024 पासून लष्करातील सैनिक भरती परीक्षा पुर्व प्रशिक्षण सुरू करण्यात येत आहे. त्यामुळे सदर प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी दि.01/08/2024 पासून ते दि.04/08/2024 पर्यंत आपल्या नावासमोर दर्शविलेल्या प्रशिक्षण केंद्रात प्रत्यक्ष जावून प्रवेश प्रक्रीया पुर्ण करुन घ्यावी.

- **प्रवेश प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे:-**

1. आधारकार्ड
2. जातीचे प्रमाणपत्र
3. वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
4. एस.एस.सी उत्तीर्ण गुणपत्रिका / प्रमाणपत्र

(मुळ कागदपत्रे व स्वयं स्वाक्षांकीत झेरॉक्स घेवून उपस्थित राहावे)

- **प्रशिक्षण केंद्रांचे नाव व पत्ता - संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे:-**

1. **सीआरजी ॲकडमी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र -**
   **राहूल जाधव** - 7666878067/7499212562
   **पत्ता** - 3 रा माळा, फडके हॉल, खजिना विहीर चौक, क्रांतीवीर वासूदेव फडके मार्ग, सदाशिव पेठ, पुणे - 411030
2. **UPSC ॲकडेमीया, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र -**
   **राहूल खंडारे** - 7666818376
   **पत्ता** - शानब्रम्हा कॉमप्लेक्स, 3 रा माळा, फरसखाना पोलिस स्टेशनच्या पुढे ABC चौक, पुणे - 411002
3. **ज्ञानज्योती स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र -**
   **विशाल भेदुरकर** - 9975806127/7887992834/5
   **पत्ता** - विठ्ठल प्रसाद बिल्डींग, अल्का टॉकीज जवळ, सदाशिव पेठ, पुणे - 411030

- **<u>रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सूचना:-</u>**

1. प्रशिक्षणास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन, इत्यादी सोय स्वत:च करावी लागेल याची नोंद घ्यावी.
2. ज्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC), केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) दिल्ली व महाराष्ट्र, महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट 'ब' व 'क', महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, Staff Selection Commission Combined Graduate Level (SSC-CGL), बँकींग (IBPS-PO) किंवा महाज्योतीच्या इतर योजनांचा लाभ घ्यायचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया करु नये. तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रवेश रद्द किंवा इतर दुसऱ्या योजनेकरीता निवड करता येणार नाही.
3. कोणत्याही माध्यमातून व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा या पूर्वी महाज्योतीच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी' या संस्थेच्या निवड यादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
4. सदर संस्थांमध्ये दि.04/08/2024 पर्यंत तात्पुरत्या निवड यादीतील विद्यार्थी रुजु न झाल्यास प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना रिक्त जागेवर संधी मिळेल.
5. कोणत्याही कारणाने परीक्षा केंद्रात बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

**नोट** :-

- शासन निर्णय क्रमांक 86/2001/मलेआ-2000/प्र.क्र.415/का-2, दि.25/05/2001 नुसार महिलांना 30% आरक्षण व शासन निर्णय क्रमांक-अनाथ-2018/प्र.क्र.182/का-03, दि.23/08/2021 नुसार अनाथांना 1% आरक्षण देण्यात आलेला आहे.
- सोबत वयोमर्यादामुळे अपात्र ठरलेल्या तसेच यापुर्वी महाज्योतीचा लाभ घेतलेल्या दुबार लाभार्थ्यांची व समान गुण असून वयोमर्यादामुळे निवड न झालेल्या विद्यार्थ्यांची यादी सोबत प्रसिद्ध करण्यात येत आहे.
- सोबत जोडण्यात आलेल्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांचा कागदपत्रांची पडताळणीकरून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्थेत प्रवेश देण्यात येईल. तसेच कोणत्याही प्रकारची पुरविण्यात आलेली माहिती चुकीची आढळून आल्यास सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येईल.

(स्वा)

(राजेश खवले)

**व्यवस्थापकीय संचालक**

महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था

(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर